संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
23 JUL 2026
प्राप्त झाले सही

श्री. मनोज बाबाराव खरबडे, लेखा अधिकारी यांच्या बदलीबाबत.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन आदेश : संलेको-२०२६/प्र.क्र.१०५(E-१७२४२१६)/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३.०७.२०२६.

संदर्भ : - १. शासन आदेश क्र.संलेको-२०२५/प्र.क्र.१५२(E-१५५७६४६)/कोषा प्रशा-२, दि.२७.०५.२०२६

### शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील खालील विवरणपत्रात नमूद अधिकाऱ्यांची स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

239

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | दि.२७.०५.२०२६ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेली पदस्थापना | सुधारीत पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री. मनोज बाबाराव खरबडे | लेखा अधिकारी (शिक्षण), शिक्षण विभाग, नाशिक | लेखा अधिकारी (शिक्षण), शिक्षण विभाग, अमरावती |

२. श्री. खरबडे यांना वरीलप्रमाणे सुधारीत पदस्थापना देण्यात आल्याने त्यांची संदर्भीय दि.२७.०५.२०२६ रोजीच्या आदेशान्वये लेखा अधिकारी (शिक्षण), शिक्षण विभाग, नाशिक या पदावर देण्यात आलेली पदस्थापना रद्द करण्यात येत आहे. तसेच, श्री. संदीप भाऊराव जेऊरकर, लेखा अधिकारी यांची दि.२९.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये लेखा अधिकारी (शिक्षण), शिक्षण विभाग, नाशिक या पदावर देण्यात आलेली पदस्थापना कायम करण्यात येत आहे.

३. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

रोकिशा
23/07/26

४. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

01503/2026/1993
23.7.2026

५. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशिल HRMS मधील नमुन्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२३/०१/२०२५

**(ता. र. पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सह सचिव, मा. मुख्यमंत्री तथा मा. मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल -१/२(लेखा व अनुज्ञयेता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई/नागपूर *
३. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
५. शिक्षण उपसंचालक, शिक्षण विभाग, नाशिक/अमरावती
६. संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
७. संबंधित अधिकाऱ्याचे बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख.*
८. प्रधान सचिव (ले. व को.), यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर,
९. श्री. मनोज बाबाराव खरबडे, लेखा अधिकारी *,
१०. श्री. संदीप भाऊराव जेऊरकर, लेखा अधिकारी *,
११. निवड नस्ती, कोषा प्रशा-२.

(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)